अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 04 सप्टेंबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 03 रा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ओबीसी प्रवर्गात मराठ्यांची घुसखोरी थांबवा

## अखिल कुणबी संघर्ष समिती ब्रम्हपुरीची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

मराठा समाजाला कुणबी म्हणून ओबीसी प्रवर्गात सामावून घेण्याचा सरकारचा प्रयत्न हा ओबीसी समाजावर अन्यायकारक, असंवैधानिक व घातक आहे. त्यामुळे अशा निर्णयाला कोणत्याही परिस्थितीत मान्यता देऊ नये, अशी ठाम मागणी ब्रम्हपुरीतील अखिल कुणबी समाज संघर्ष समिती व ओबीसी समाजाने उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे मुख्यमंत्री तसेच शासनाकडे केली आहे.



ओबीसी प्रवर्गाच्या हक्कांवर मराठा समाजाचा डल्ला असल्याचा आरोप करताना, ओबीसी समाज ब्रम्हपुरी यांनी इशारा दिला की, 'सरकारने ओबीसी प्रवर्गात मराठ्यांना सामावून घेतल्यास खऱ्या वंचित घटकांच्या संधी हिरावल्या जातील, शैक्षणिक व सामाजिक प्रगती थांबेल आणि सामाजिक तणाव निर्माण होईल.' निवेदन देण्यासाठी अखिल कुणबी समाज संघर्ष समिती चे कार्यकर्ते व ओबीसी समाज बांधव छत्रपती शिवाजी चौकात मोठ्या संख्येने जमले होते. यावेळी 'आरक्षण आमच्या हक्काचा, नाही कोणाच्या बापाचा', 'मराठ्यांची घुसखोरी नाही चालणार', 'जय ओबीसी जय संविधान', 'ओबीसी एकता जिंदाबाद' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी महिला विद्यार्थी विद्यार्थिनी व समाज बांधव यांचा मोठा सहभाग होता.

ओबीसी समाजाने स्पष्ट केले की, 'मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण द्यावे यात हरकत नाही, पण ओबीसी प्रवर्गात त्यांना सामावून घेणे अजिबात मान्य होणार नाही.'

### ५ सप्टेंबरला छत्रपती शिवाजी चौकात विशाल धरणे व निदर्शने आंदोलन!

**छत्रपती शिवाजी महाराज चौक, ब्रम्हपुरी येथे शुक्रवार, ५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते ३ वा. शासनाचे लक्ष वेधण्याकरिता विशाल धरणे व निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे या आंदोलनामध्ये ओबीसी प्रवर्गातील सर्व समाज बांधवांनी, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ओबीसींच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन ओबीसी आरक्षण बचाव संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आले आहे.**

## प्रभाग रचनेत बदल न झाल्यास न.प. निवडणुकीवर बोंडेगाववासियांचा बहिष्कार



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगर परिषदेची निवडणूक नजिकच्या भविष्यात होऊ घातली आहे. त्याकरिता नगर परिषदेने प्रभाग रचनेचे प्रारूप तयार केले आहे. प्रारूप प्रभाग रचनेत बोंडेगाव हुडकी वेगळी करून त्या भागाला प्रभाग क्रमांक ०६ मध्ये समाविष्ट केले आहे. वास्तविक बोंडेगाव व बोंडेगाव हुडकी हे एकच गाव असून हुडकी भागाला बोंडेगाव मधून वेगळा करण्याचा विरोधकांचा कुटिल डाव आहे असे बोंडेगाव वासियांचे मत झाले आहे.

या बाबीकडे निवडणूक विभागाने लक्ष न दिल्यास व बोंडेगाव पासून बोंडेगाव हुडकी वेगळी झाल्यास ग्रामवासी मतदानावर बहिस्कार टाकणार आहे. या आशयाचे निवेदन गाव वासियानी मान. जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार व मुख्याधिकाऱ्यांना दिले आहे.

निवेदन देताना बाळू राऊत शहर काँग्रेस अध्यक्ष, राजेश तलमले, गव्हर्नर रामटेके, चक्रेश करंबे, नेताजी मेश्राम, प्रा. डी के मेश्राम, राममोहन ब्राडिया, तारकेश राऊत, लोकमन शास्त्रकार, वेणुदास करंबे, दिनेश मेश्राम, मधुकर ढोरे, सुधीर रामटेके, कलिचरण बगमारे, निखिल करंबे, अभय भागडकर, अक्षय कुथे, दिलगंभीर कुथे, पिंटू सौंदरकर, प्रदीप ठेंगरे, निखिल सहारे, पद्माकर रामटेके, प्रेमनाथ बगमारे, आकाश वैद्य, व बोंडेगाव मधील जेष्ठ व युवा नागरिक उपस्थित होते.




## नेवजाबाई भैया हितकारिणी सार्व. गणेश मंडळाला आम. बंटी भांगडियांची भेट



ब्रह्मपुरी/का.प्र.

चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार श्री.कीर्तीकुमार (बंटी) भांगडिया यांनी गणेशोत्सव निमित्ताने ब्रम्हपुरी येथील प्रसिद्ध नेवजाबाई भैय्या हितकारीणी सार्वजनिक गणेश मंडळाला भेट देऊन श्री. गणेशाचे दर्शन घेऊन महाआरती केली.

गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर नेवजाबाई भैया हितकारीणी सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने केलेले आकर्षक सजावट, राबविण्यात येणारे सामाजिक उपक्रम, स्पर्धा, मनोरंजन, आनंद मेळावा या बद्दल त्यांनी गणेश मंडळ व्यवस्थापनाचे अभिनंदन व

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## संपादकीय...

# नवी गुंतागुंत

देशाच्या राजकीय पटावर आता अभूतपूर्व उलथापालथ सुरू आहे. एका बाजूला संघप्रमुख मोहन भागवत यांच्या ७५ वर्षांनंतरच्या निवृत्तीवरून निर्माण झालेली चर्चा, तर दुसऱ्या बाजूला केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या एथेनॉल प्रकल्पावर सर्वोच्च न्यायालयात सुरू झालेली सुनावणी हे दोन मुद्दे सध्या केवळ स्वतंत्र घटनाच नसून भारतीय राजकारणाच्या आतल्या थरांना हलवून टाकणारे ठरत आहेत. संघाच्या परंपरेनुसार ७५ वर्षांनंतर सरसंघचालकांनी पदत्याग करणे अपेक्षित आहे. परंतु आजवर कधीही या वयमर्यादेवर इतकी सार्वजनिक चर्चा झालेली नव्हती. कारण यातून पुढे येणारा संदेश हा केवळ संघाच्या आतल्या नेतृत्व बदलाचा नसून प्रधानमंत्री मोदींच्या भवितव्याशी थेट निगडित आहे. मोहन भागवत यांच्या ७५ वर्षांनंतरच्या निवृत्तीची चर्चा ही फक्त संघाची अंतर्गत बाब म्हणून मांडली जात आहे. पण हा ‘संघाचा शिस्तबद्ध नियम’ म्हणावा की मोदी युगाला मर्यादा आणण्यासाठीचा सिग्नल, हा खरा प्रश्न आहे.

संघ कधीच थेट भिडत नाही; पण सूचक इशारे देतो. हा इशारा स्पष्ट आहे ‘मोदी हे संघापेक्षा मोठे नाहीत.’ भागवत यांच्या जाण्याने मोदींना मुक्त पथ मिळणार का? की संघातर्फे मोदींवर अंकुश ठेवण्यासाठी नवीन समीकरण रचले जात आहे? या चर्चामुळे भाजपच्या संघटनात गुप्त अस्वस्थता पसरलेली दिसते. नितीन गडकरी यांनी पुढे आणलेला एथेनॉल प्रकल्प हरितऊर्जा व पर्यावरणपूरक इंधन म्हणून सरकारने मोठ्या धडाक्यात राबवला. फायदेही मांडले गेले – हरितगृह वायू उत्सर्जनात घट, शेतकऱ्यांना ऊस-मका याचा फायदा, परकीय चलनाची बचत. परंतु सर्वोच्च न्यायालयाने आता गंभीर प्रश्न विचारले एथेनॉलमुळे वाहनांचे मायलेज खरेच घटते का? गाड्यांचे इंजिन आयुष्य कमी होते का? पेट्रोलपेक्षा महाग असताना एथेनॉलचा जबरदस्ती वापर का? याहून महत्त्वाचे म्हणजे, गडकरी यांच्या कुटुंबाशी संबंधित कंपनीच्या शेअर्सना प्रचंड आर्थिक लाभ झाला, हे उघडकीस आले. म्हणजेच पर्यावरणपूरक धोरणाच्या आड कॉर्पोरेट स्वार्थाचा डाव असल्याचा आरोप आता जोर धरू लागला आहे. निवृत्तीच्या चर्चेपासून, एथेनॉलच्या संशयास्पद गणितांपर्यंत आणि कॉर्पोरेट घराण्यांच्या वर्चस्वापर्यंत भारतीय राजकारण आज सत्तेच्या, पैशाच्या आणि विचारसरणीच्या संगमात अडकलेले दिसते. येत्या काही आठवड्यांत येणारे निकाल मग ते उपराष्ट्रपती निवडणुकीचे असोत, न्यायालयीन सुनावण्या असोत किंवा संघातील नेतृत्व बदल – हे ठरवतील की भारताचे राजकीय भविष्य स्थैर्याच्या दिशेने जाते की अस्थैर्याच्या खाईकडे. निवृत्तीपासून एथेनॉलपर्यंत सत्तेचा खोटा आव आणणारे आहे. भारतीय राजकारणात आज जी चित्रे दिसत आहेत, ती लोकशाहीच्या आरशाला फट पडल्यासारखी आहेत.

संघ, भाजपा, कॉर्पोरेट घराणी आणि सरकार यांच्यातील खेळ इतका गुंतागुंतीचा झालाय की साधा शेतकरी, सामान्य नागरिक आणि मध्यमवर्ग कुठेतरी फसवला जातोय. नितीन गडकरी आणि एथेनॉल -मागचे षडयंत्र स्पष्ट होते. नितीन गडकरींचे नाव आजवर ‘विकासपुरुष’ म्हणून घेतले जाते. रस्ते, पायाभूत सुविधा, आणि एथेनॉलसारख्या ऊर्जाविषयक प्रकल्पांमुळे त्यांची दूरदृष्टी म्हणून स्तुती केली गेली. पण सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीनंतर उघडकीस आलेल्या गोष्टींनी या ‘दूरदृष्टी’ मागे भले मोठे राजकीय-आर्थिक षडयंत्र असल्याचा आरोप बळकट केला आहे. संघप्रमुख मोहन भागवत यांच्या ७५ वर्षांनंतरच्या निवृत्तीची चर्चा ही केवळ परंपरा म्हणून रंगवली जाते. पण वस्तुस्थिती अशी की, हा संघाचा मोदींना इशारा आहे. मोदी स्वत:ला संघापेक्षा वरचे समजतात, हे संघाला अस्वस्थ करते. म्हणजेच ही लढाई देशासाठी नाही, तर मोदी विरुद्ध संघ कोण मोठा? या अहंकारासाठी आहे. मोदींनंतर भारताला संघाची कठोर पकड मिळणार का? की कॉर्पोरेट घराण्यांचे पूर्ण वर्चस्व होणार? किंवा मोदी स्वत: ‘कॉर्पोरेट-समर्थ हुकूमशहा’ म्हणून पुढचे दशक रंगवणार? हा प्रश्न केवळ राजकीय नाही; तो देशाच्या अर्थकारण, पर्यावरण आणि लोकशाहीच्या भविष्याशी जोडलेला आहे. लोकशाहीचे आवरण, हुकूमशाहीचे अंतरंग आज निवृत्ती, एथेनॉल, अदानी-अंबानी यांचा गाजावाजा होत आहे. पण जनता विसरत आहे की – शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पोकळ आहे, तरुणांच्या रोजगाराचे भविष्य अंधारात आहे, पर्यावरणाच्या नावाखाली पैसा ओढला जातोय, आणि लोकशाहीचे मुखवटे घालून कॉर्पोरेटशाहीचे साम्राज्य उभे राहत आहे. मोदीपश्चात भारत हा लोकशाहीचा नवा अध्याय असेल का, की कॉर्पोरेटशाहीच्या गुलामीचे उघड साम्राज्य? हा प्रश्न आज प्रत्येक नागरिकाने स्वत:ला विचारण्याची वेळ आली.

# ने.हि. कन्या विद्यालयात क्रिडा दिन साजरा



ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय ब्रम्हपुरी येथे दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोज शुक्रवारला क्रिडा दिनाचे आयोजन करण्यात आले.

क्रिडादिनानिमित्त मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम तसेच पर्यवेक्षिका खंडाते मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मेजर ध्यानचंद यांच्या जीवनावर बन मॅडम यांनी आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. प्रसंगी क्रीडा दिनानिमित्त रॅली काढण्यात आली. खेळाचे व व्यायामाचे महत्त्व बारेकर सर यांनी पटवून दिले. तसेच मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, दलाल मॅडम, बन मॅडम, बारेकर सर यांनी विद्यालयातील राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा सत्कार केला.

हॉवॉली टीम, बास्केटबॉल, मैदानी खेळाडू , कबड्डी तसेच हँडबॉल टीमच्या सर्व खेळाडूंचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. शाळेच्या शिक्षिका, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व खेळाडू विद्यार्थिनींचे अभिनंदन व कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन बन मॅडम यांनी केले.

# पूलाच्या अर्धवट बांधकामाने नागरिकांची गैरसोय

## वाहतूक वारंवार ठप्प



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी-वडसा मार्गादरम्यानच्या भूतीनाल्यावरील पुलाचे बांधकाम अर्धवट अवस्थेत असून, पूर आला की, या मार्गावरील वाहतूक ठप्प होते. शासनाने व संबंधित कंत्राटदाराने बांधकामाची ‘डेडलाईन’ न पाळल्याने संकटांना सामोरे जावे लागत असल्याने नागरिकांचे म्हणणे आहे.

ब्रह्मपुरी-वडसा हा राज्यमार्ग आहे. या मार्गावर गडचिरोली जिल्ह्याच्या वडसा, कुरखेडा, कोरची, लाखांदुर आदी तालुक्याला जोडणारा हा पूल आहे. ब्रह्मपुरी तालुक्यातील अर्धे अधिक गावे पुलाच्या विरुद्ध बाजूला आहेत. जुन्या पुलाची उंची कमी असल्यामुळे अधिक उंचीचा पूल बनविण्याचे काम दोन वर्षांपासून सुरू आहे. मात्र, अद्याप पूर्ण झाले नाही. पाऊस आला की, वाहतूक ठप्प होऊन विद्यार्थी, व्यापारी व रुग्णांचे हाल होतात. पुलाच्या बाजूने एक रपटा तयार करण्यात आला. पाऊस पडल्यानंतर हा रपटा बंद होतो. वारंवार वाहतूक बंद होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

ब्रह्मपुरी येथील रुग्णालयात दररोज शेकडो रुग्ण वडसा, कुरखेडा, कोरची, मालेवाडा, लाखांदूर परिसरातून उपचारासाठी येतात, पुलाचे बांधकाम न झाल्याने लाखांदूर येथील एक महिला रुग्ण दगावल्याची घटना घडली आहे. अनेक विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयात वेळेत पोहोचता येत नाही. रुग्णवाहिका आल्यास तिला ताटकळत राहावे लागते. त्यामुळे रुग्णालयात पोहोचण्यास विलंब होतो. हा नित्याचा प्रकार झाल्याने नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे.

# रामचंद्र निखाडे यांचे निधन



ब्रह्मपुरी/का.प्र.

चांद्रपूर आणि गडचिरोली जिल्हा महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचे प्रथम संस्थापक अध्यक्ष तसेच नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावरून सेवानिवृत्त झालेले रामचंद्रजी निखाडे यांचे दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ सोमवारला रात्रो १:३० वा. वयाच्या ७५ व्या वर्षी दुख:द निधन झाले. त्यांनी प्रशासकीय कर्मचारी संघटना स्थापन करुन ती सशक्त केली. या संघटनेव्दारे अनेकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अविरत प्रयत्न केले. त्यांच्यावर मंगळवारी दुपारी १२.०० वा. येथील मोक्षधाम भूतीनाला येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, तीन मुली, एक मुलगा व बराच आप्तपरिवार आहे.

## विनोदिनी

रामूला एक दिवस ऑफिसला सुट्टी मारायची होती. त्यासाठी त्याने एक शक्कल लढवली. त्याने ऑफिसमध्ये फोन केला. ऑफिसमधला फोन खणाणतो.

रामू : सर, मी रामू बोलतोय... मला अतिरेक्यांनी पळवून नेलंय. माझ्या डोळ्यांवर पट्टी बांधलीय, माझे हात-पाय बांधलेत. मला ते कुठेतरी लांब घेऊन जातायत. मी काय करू...?

बॉस : बघ तुला कसं जमतंय ते. हवं तर थोडं उशिरानं ये, पण कामावर ये.... आधीच माणसं कमी आहेत.. अन तुझं हे नवीनच नाटक...!!!

# अऱ्हेरनवरगांवच्या 'त्या' पोरक्या मुलींना अखिल कुणबी समाजाचा हात

## समाज मंडळातर्फे १ लाख ५१ हजाराची आर्थिक मदत



ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील अऱ्हेरनवरगांव येथील दोन चिमुरड्या काही दिवसांतच आई-वडिलांच्या छत्रछायेशिवाय पोरक्या झाल्या. ही हृदयद्रावक घटना समाजाला अंतर्मुख करणारी ठरली आहे. समाजभान जोपासत दोन्ही मुलींच्या भविष्याकरीता येथील अखिल कुणबी समाजाच्या वतीने आर्थिक मदतीचा हात देण्यात आला.

अवघ्या दोन महिन्यांपूर्वी वडिलांचे, तर दहा दिवसांपूर्वी पोळा सणाच्या दिवशी आईचे दु:खद निधन झाल्याने प्राजक्ता (सात वर्ष) व शुभ्रा (दीड वर्ष) या दोन चिमुरड्यांवर व तिच्या आजी सुलोचना व आजोबा वसंता ठेंगरे यांच्या कुटुंबावर दु:खांचे संकट कोसळले. त्यांच्या आयुष्याच्या कोवळ्या वयातच असे दु:ख ओढवणे ही काळजाला पिळवटून टाकणारी घटना आहे. या दुर्दैवी प्रसंगी ब्रह्मपुरी तालुक्यातील कुणबी समाजाने सामाजिक दायित्वाची जाणीव जोपासत पुढाकार घेतला आणि या दोन बालिकांच्या भविष्यासाठी आधाराचा हात दिला. अखिल कुणबी समाज, ब्रम्हपुरी यांच्या वतीने चिमुरड्यांच्या आजी-आजोबांकडे प्रत्यक्ष घरी जाऊन मदत देण्यात आली. समाजाच्या वतीने त्यांना ११ हजार रुपये रोख स्वरूपात तर १ लाख ४० हजार रुपये फिक्स डिपॉझिट या माध्यमातून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी सुरक्षित ठेवण्यात आले. अशा प्रकारे एकूण १ लाख ५१ हजार रुपयांची मदत अनाथ बालिकांसाठी देण्यात आली.

यावेळी गावातील सतीश ठेंगरे, विलास उरकुडे माजी उपसभापती, संजु ढोरे आणि मोहल्यातील समाज बांधव, ग्रामस्थ, तसेच त्यांच्या मामा-मामी, आजी-आजोबा, काका-काकी व आप्तेष्ट मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांत्वनपर वातावरणात झालेल्या या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी दु:खात उभे राहतांना फक्त भावनिक आधार न देता ठोस स्वरूपातील आर्थिक मदत करणे हीच खरी समाजभावना असल्याचे अधोरेखित केले. समाजाचा हा उपक्रम केवळ आर्थिक मदतीपुरता मर्यादित नसून त्या दोन चिमुरड्यांच्या भविष्यातील शिक्षण, संगोपन व उज्ज्वल वाटचालीची जबाबदारी सामूहिकपणे स्वीकारण्याचा संदेश देणारा आहे.

ब्रह्मपुरी तालुक्यातील कुणबी समाजाने केलेला हा आदर्श उपक्रम इतरांना प्रेरणा देणारा ठरावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. प्रसंगी ब्रह्मपुरी तालुका कुणबी समाजाच्या वतीने प्रेमलाल धोटे, अशोक पिलारे, महिंद्र मातेरे, अनिल दोनाडकर, प्रकाश धोटे, ॲड. नाकतोडे, राजेश पारधी, निहाल ढोरे, मनोज वझाडे, अशोक पिलारे, अवी राऊत, प्रणय सोंदरकर व अन्य समाज बांधव उपस्थित होते.

# तन, मन सुदृढ करण्याचे माध्यम म्हणजे खेळ

## प्राचार्य डॉ. वरभे : ने.हि. महाविद्यालयात क्रिडा दिन



ब्रह्मपुरी/का.प्र.

'ब्रह्मपुरी जशी शैक्षणिक नगरी तशीच ती क्रीडानगरीसुध्दा आहे. येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाचे सक्रीय संस्थासचिव अशोक भैया यांनी भव्य क्रीडांगण, इन डोअर स्टेडियमची व खेळांसाठी लागणाऱ्या नि:शुल्क साहित्याची सोय आपल्याला करुन दिली आहे. येथील मैदानावर चालणाऱ्या विविध खेळातून खेळाडू घडले. ते राज्य, राष्ट्र पातळीवर पोहचल्याचा इतिहास आहे. राज्यस्तरीय हॉकीस्पर्धा, हॉलीबॉल स्पर्धा नेहमी इथे घेतल्या जातात. मेजर ध्यानचंदकडून आपण प्रेरणा घेऊन खेळांमध्ये कौशल्य प्राप्त केले पाहिजे. कारण खेळ तन, मन सुदृढ करण्याचे माध्यम आहे.' असे विचार शांताबाई भैया महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव वरभेंनी व्यक्त केले. ते महाविद्यालयात मेजर ध्यानचंद जयंती व राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त कार्यक्रमात बोलत होते.

अध्यक्षस्थानी ने. हि. महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर तर प्रमुख अतिथीमध्ये क्रीडा विभाग प्रभारी डॉ. असलम शेख, डॉ. रेखा मेश्राम, प्रा. विनोद नरड, डॉ.धनराज खानोरकर, डॉ हर्षा कानफाडे, डॉ. कुलजित शर्मा, पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर इ.मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी विविध खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्प देऊन गौरव करण्यात आला. प्राचार्य डॉ शेकोकरांनी मेजर ध्यानचंदच्या जीवनावर प्रकाश टाकला.

संचालन डॉ कुलजित शर्मा यांनी तर आभार संजू मेश्रामांनी केले. हा कार्यक्रम ने.हि. महाविद्यालय व शांताबाई भैया महिला महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आला.

# महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फॉर्मसी येथे गणपती बाप्पांचे जल्लोषात विसर्जन



ब्रम्हपुरी/का.प्र.

बेटाला येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी तसेच महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक आणि राष्ट्रीय सेवा योजना गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने दि.३१ ऑगस्ट २०२५ रोजी श्रींचे डी.जे.च्या तालावर विसर्जन करण्यात आले. ह्या वेळेस तीनही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन दुधे , सुयोग बाळबुधे व डॉ.व्यंकटेश क्यावर्स, विभाग प्रमुख विशाल लोखंडे तसेच सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक गण व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

हा गणपती उत्सव पाच दिवस निरंतर अती उत्साहात साजरा केला गेला असून यामध्ये वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रमांचे तसेच विविध क्रीडा प्रकारांचा समावेश होता. रस्सी खेच, हंडी फोड, वॉलीबॉल,बुध्दीबळ, कॅरम, एकल डान्स व समूह डान्स तसेच एकल गीत, समूह गीत, थ्रो बॉल, प्रत्येक क्लास तर्फे फ्लॅश मॉब नृत्य गायन, पेपर डान्स आणि अंताक्षरी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ३० ऑगस्टला भजन तथा गोपाल काला दही हंडी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

दर वर्षीप्रमाणे यंदाही सर्व विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे व शिस्तबध्द पध्दतीने प्रत्येक कार्यक्रमामध्ये आपला सहभाग नोंदविला. विजेत्या व उपविजेत्या चमुंना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र पिसे यांची वेळोवेळी प्राप्त झालेली मदत व मार्गदर्शन तसेच सर्व प्राचार्य, प्राध्यापक गण आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सक्रिय सहभाग होते. श्री गणेशाचे विसर्जन दि.३१ ऑगस्टला सर्व प्राचार्य, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

# ब्रम्हपुरीच्या गणेशोत्सवात विदर्भस्तरीय दहीहंडी स्पर्धा

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपूरीचा महाराजा गणेश उत्सव मंडळाच्या वतीने विदर्भस्तरीय दहीहंडी उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उद्घाटक म्हणून आमदार विजयभाऊ वडेट्टीवार उपस्थित होते. अध्यक्षस्थानी खासदार डॉ नामदेव किरसान हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून कॉंग्रेसचे डॉ देविदास जगनाडे, ॲड राम मेश्राम, खेमराज तिडके, कृउबा सभापती प्रभाकर सेलोकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विविध जिल्ह्यांतील गोविंदा पथकांनी या दहीहंडी मध्ये सहभाग दर्शविला होता. गोविंदांनी रिंगणात तयार केलेले चित्तथरारक मानवी मनोरे बघण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

या स्पर्धेचा प्रथम पारितोषिक १ लाख ११ हजार १११ रू. आदीशक्ती शितलामाता गृप भंडारा यांनी पटकावला. तर द्वितीय पारितोषिक ५५ हजार ५५५ रू. शितलामाता गृप चंद्रपूर यांनी पटकावला.

# ब्रम्हपुरीच्या गणेश उत्सवाच्या जत्रेत शौचालयांच्या अभावी नागरिकांची कुचंबना

## न.प.चे दुर्लक्ष, स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा गणेशोत्सवाची धूम सुरु झाली आहे. उत्सवादरम्यान विविध झुले, दुकाने व मनोरंजनाचे साधन येतात आणि बाहेरून लोक मोठ्या संख्येने येतात. यामुळे शहराला जत्रेचे स्वरुप प्राप्त होते. परंतु, शौचालयाच्या सुविधांमध्ये गंभीर दुर्लक्ष झाल्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

नगर परिषदेने शौचालयांच्या सोयीकडे लक्ष न दिल्यामुळे महिलावर्ग आणि इतर नागरिक संताप व्यक्त करत आहेत. खास करून, जत्रेतील दुकानदार, झुलेवाले आणि बाहेरून येणारी जनता शौचालयाच्या सोयीअभावी अत्यंत अडचणीत येत आहे. तसेच, गणेशोत्सवाच्या मुख्य ठिकाणांवर जत्रेतील येणारी माणसे रस्त्यावरच शौचालय वापरत असल्याने दुर्गंधी पसरत आहे, ज्यामुळे शहराच्या स्वच्छतेसाठी गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. 'स्वच्छ ब्रम्हपुरी व सुंदर ब्रम्हपुरी' या उपक्रमांतर्गत तलावाच्या ठिकाणी सौंदर्याकरण कार्य सुरू असले तरी, त्याच ठिकाणी रस्त्यावर शौचालयांची स्थिती पाहता या कार्यात शंकेचे वलय तयार होते. यामध्ये महिलांना आणि शाळकरी मुलींना रस्त्यावर जातांना अनवधानाने खाली मान घालून जावे लागते, यामुळे या भागांमध्ये सार्व. शौचालयाची मागणी जोरकसपणे नागरिक करीत आहेत.

### नगर परिषदेने उपाययोजना करावी - नागरिकांची मागणी

**जत्रेतील दुकानदार, झुलेवाले व बाहेरून येणाऱ्या नागरिकांसाठी शौचालयाच्या सुविधांची पुरेशी व्यवस्था अद्याप केली गेलेली नाही. त्यामुळे महिला वर्गाकडून शालेय विद्यार्थ्यांसह जत्रेतील उपस्थित सर्व नागरिकांसाठी शौचालयाच्या सोयीचे तातडीने व्यवस्थापन करण्याची मागणी केली जात आहे. नगर परिषदेला यावर तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे, अन्यथा स्वच्छतेच्या बाबतीत नागरिकांची अडचण आणखी वाढू शकते. शहरातील स्वच्छतेचा मुद्दा जितका महत्त्वाचा आहे, तितकाच नागरिकांच्या आरोग्याचा मुद्दा देखील अत्यंत संवेदनशील आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने यावर तत्काळ निर्णय घेऊन योग्य सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.**

# बॅडमिंटन स्पर्धेत एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांचे यश







ब्रम्हपुरी/का. प्र.

येथील एल.एम.बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य संचालित जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत १४ वर्षाखालील मुली व १७ वर्षाखालील मुलांचा बॅडमिंटन संघ विजयी होऊन जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेकरिता पात्र ठरले आहे.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारीणी शिक्षणसंस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका व सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा प्रदान केल्या. विद्यार्थ्यांनी विशाल सर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# तालुकास्तरीय रानभाजी महोत्सव संपन्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुका कृषी अधिकारी कार्यालय, ब्रह्मपुरी व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) च्यावतीने तहसील कार्यालय



सभागृह येथे रविवारी (दि. ३१) रानभाजी महोत्सव साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रह्मपुरी तहसीलदार सतीश मासाळ होते. तर प्रमुख पाहुणे उपविभागीय कृषी अधिकारी प्रफुल्ल गव्हारे, पोलिस निरीक्षक बानबले, कृषी अधिकारी चौधरी, मेश्राम, लोखंडे उपस्थित होते. या रानभाजी महोत्सवास ब्रह्मपुरी येथील तसेच आजूबाजूच्या गावातील नागरिकांनी भेट देऊन रानभाज्यांची माहिती घेतली व खरेदी केली. या महोत्सवात तालुक्यातील कृषी सखी व बचत गटातील महिला तसेच शेतकऱ्यांनी २५-३० प्रकारच्या विविध रानभाज्या व त्यापासून बनणारे विविध पदार्थ प्रदर्शनी व विक्रीसाठी ठेवल्या होत्या. तालुका कृषी अधिकारी स्वाती घुले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकात रानभाज्यांमध्ये विविध प्रकारचे औषधी गुणधर्म असल्याने त्यांचे आहारातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. मानवी आहारात रानभाज्यांचा समावेश वाढावा व रानभाज्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी रानभाजी महोत्सवाचा उद्देश, राणभाजींचे आहारातील महत्त्व याबाबत माहिती दिली. पर्वणी पाटील यांनी शेतकऱ्यांना विविध रानभाज्यांमधील औषधी गुणधर्मावर मार्गदर्शन केले.

यावेळी कृषी अधिकारी चौधरी यांनी रानभाज्यांपासून विविध प्रकारचे पदार्थ वर्षातून एकदा तरी खाल्ल्या पाहिजे, त्यामुळे आपल्या शरीराला आवश्यक असणारे घटक या रानभाज्यांमुळे उपलब्ध होतील असे सांगितले. लोखंडे यांनी विविध प्रकारच्या रानभाज्यांचे औषधी गुणधर्म आपल्या मार्गदर्शनात सांगितले. तसेच ब्रह्मपुरी तहसीलदार सतीश मासाळ यांनी रानभाज्या या केवळ पावसाळ्यातच उपलब्ध होत असल्याने त्यांचा आपण आहारात समावेश करावा असे सांगितले.

❀❀❀❀❀❀

# गांगलवाडी-मेंडकी जि.प. क्षेत्रातील काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक



ब्रम्हपुरी/का.प्र.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीच्या अनुषंगाने ब्रम्हपूरी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने ब्रम्हपुरी तालुक्यातील गांगलवाडी- मेंडकी जि.प. गण व पं.स. गणामधील काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संघटनात्मक बैठक दि.३० ऑगस्ट २०२५ रोजी, मेंडकी येथील सभागृहात पार पडली.

यावेळी बैठकीला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सचिव डॉ.थानेश्वर कायरकर, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ राजेश कांबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमुरकर, तालुका महिला काँग्रेस कमिटी अध्यक्षा मंगलाताई लोनबले, जिल्हा परिषद माजी सदस्य भावनाताई ईरपाते, जिल्हा काँग्रेस सहसचिव गाझी पटेल, मेंडकी ग्रामपंचायत सरपंच मंगलाताई ईरपाते, तालुका काँग्रेस सहसचिव अमित कन्नाके, अनुसूचित जाती सेलचे जिल्हा महासचिव प्रा.डि.के.मेश्राम, बाजार समितीचे संचालक प्रमोद मोटघरे, पंचायत समिती माजी उपसभापती शामराव ईरपाते, अन्नाभाऊ ठाकरे, कृषी उत्पन्न बाजार समिती ब्रम्हपुरी माजी सभापती मनोहर गजभे,यांसह अन्य काँग्रेस पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव पदी डॉ.थानेश्वर कायरकर यांची निवड झाल्याबद्दल मेंडकी ग्राम काँग्रेस कमिटी तर्फे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सोबतच पक्षाला बळकट करून पक्ष विस्तार करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. सदर बैठकीला मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ने.हि. उच्च माध्य. विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

## तालुकास्तरीय विज्ञान नाट्यउत्सव स्पर्धेत प्रथम क्रमांक



ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी शहर म्हणजे संस्कृतीची उधळण. ब्रह्मपुरीमध्ये शिक्षण, आरोग्य तथा संस्कृती ही परंपरेने जपली जाते. ब्रह्मपुरी येथील नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालय ब्रह्मपुरी मागील वर्षापासून अनेक स्पर्धांमध्ये यशोशिखर गाठून आपले चंद्रपूर जिल्ह्यातच नव्हे तर विदर्भात नावलौकिक केलेला आहे. मागील वर्षी 'माझी शाळा सुंदर शाळा' या स्पर्धेमध्ये भाग घेऊन विभागातून प्रथम पारितोषिक पटकावण्यात यश मिळवले.

हीच यशाची परंपरा कायम ठेवत नेवजाबाई हितकारिणी विद्यालय शासन नियमानुसार ज्या स्पर्धा होतात त्यामध्ये आवर्जून भाग घेत असते आणि यामधील शिक्षक विद्यार्थी त्याकरिता आटोकाठ प्रयत्न आणि मेहनत करत असतात. नुकताच होऊ घातलेल्या तालुकास्तरीय विज्ञान नाट्य उत्सव स्पर्धेत नेवजाबाई हितकारणी उच्च माध्यमिक विद्यालय च्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावीत जिल्ह्यावर मजल मारलेली आहे. वरील स्पर्धा चे आयोजन नेवजाबाई हितकारणी कन्या विद्यालय येथे करण्यात आलेले होते. या स्पर्धेचे परीक्षक मोहुंरले सर, बिजागरे सर, नागोसे सर होते. वरील कार्यक्रमास प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ब्रह्मपुरीच्या शिक्षण अधिकारी शेळके मॅडम, ने.ही कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम, ने.ही.उच्च माध्यमिक विद्यालय ब्रह्मपुरीचे मुख्याध्यापक के. एम. नाईक सर उपस्थित होते.

वरील विज्ञान नाट्य उत्सव स्पर्धेत तालुक्यातील एकूण आठ शाळांचा सहभाग होता. यात 'स्मार्ट शेती' हा विषय घेऊन नाटिकाकरण सादर करायचे होते. त्यामध्ये नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालयातील चमूने प्रथम क्रमांक पटकाविला. वरील नाटिकेसाठी निलेश दोनाडकर सर, देशमुख मॅडम यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.

## ब्रम्हपुरी शहर भाजपच्या विविध मोर्चा व आघाड्यांची कार्यकारिणी जाहिर

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी विधानसभेचे माजी आमदार, भाजपा नेते प्रा. अतुलभाऊ देशकर यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपा चंद्रपूर जिल्ह्याचे अध्यक्ष हरीशजी शर्मा यांच्या सहमतीने ब्रह्मपुरी शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे यांनी आपली ब्रह्मपुरी शहराची भारतीय जनता पार्टी विविध मोर्चा व आघाडी यांचे अध्यक्ष जाहीर केले आहे.

या मध्ये भाजपा युवा मोर्चा अध्यक्षपदी अमित रोकडे, महिला आघाडी शहर अध्यक्षपदी वर्षा चौधरी, किसान आघाडी अध्यक्ष इंजी.अरविंद कुंभारे, अनुसूचित जाती आघाडी अध्यक्ष पदी प्रकाश लोखंडे, अनुसूचित जमाती पदी प्रा.विनय दडमल, ओ.बी.सी. मोर्चा अध्यक्षपदी दिलीपजी जुंबडे व अल्पसंख्याक अध्यक्ष पदी प्यारूसिंग जुनी यांची निवड करण्यात आली आहे.

शहरातील भौगोलिक व सामाजिक दृष्टीने अध्यक्ष यांची निवड करण्यात आली असून नव्या उमेदीच्या व्यक्तींना यात संधी देण्यात आली आहे. सर्व नवनियुक्त अध्यक्षांना भाजपा नेते माजी आमदार प्रा. अतुल देशकर, प्रदेश परिषद सदस्य प्रा. कादर शेख, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव प्रा. प्रकाश बगमारे, भाजपा जिल्हा सचिव रश्मी पेशने खानोरकर, साकेत भानारकर, शहर महामंत्री मनोज भूपाल, पवन जयस्वाल, माजी शहर अध्यक्ष अरविंद नंदुरकर, माजी नगरसेवक मनोज वठे, भाजयुमो जिल्हा सरचिटणीस तनय देशकर, प्रा. अशोक सालोटकर, स्वप्नील अलगदेवे, प्रा. चंद्रकात विटाळकर, प्रा. संजय लांबे यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.

## - ब्रम्हपुरी शहरातील गणेश मुर्ती दर्शन -




तरुण गणेश उत्सव मंडळ, जानी वार्ड, ब्रम्हपुरी



सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ, ब्रम्हपुरी


Miracle constructions & Developers



श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337



गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.




### ... QUOTES ...

"Nothing is impossible. The word itself says "I'm possible!""

- Audrey Hepburn

### चारोळी

श्रध्दांजलीच्या भाषणात ते नेहमीच
इतके स्तुतीपर बोलतात...
की जमलेल्यांपैकी कुणी त्यांना,
स्वतःसाठी बुक करून घेतात...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये तिरंगा क्रियाकलाप ॲक्टिव्हिटी संपन्न







ब्रम्हपुरी/का.प्र. येथील एलएमबीपीएस मध्ये ७९ वा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दिनानिमित्य प्रि-स्कुलच्या विद्यार्थ्यांकरीता तिरंग्याची क्रियाकलाप ॲक्टिव्हिटी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी नेवजाबाई हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर प्रि-स्कूलच्या विद्यार्थ्यांचा तिरंगा तयार करून सर्व विद्यार्थ्यांनी झंडा गीत म्हटले. त्यानंतर भारत माता की जय, वंदे मातरम च्या जय घोषात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेकडी कडे त्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. सर्व विद्यार्थी पांढऱ्या रंगाचे वस्त्र परिधान करून आलेले होते.

त्यानंतर त्यांनी तिरंग्याची क्रियाकलाप ॲक्टीविटी करून ट्राय कलर फुड चा आनंद घेतला. प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना बिस्किट वाटप करण्यात आले.

प्रसंगी शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य नगादिर गुरेशी सार, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम व प्रि-स्कुलच्या शिक्षिका विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

✻✻✻✻✻✻

## नेवजाबाई भैया हितकारिणी सार्व...

(पान क्र. ९ वरून)

कौतुक केले. हा सार्वजनिक गणेश उत्सव मोठ्या हर्षोउल्हासात साजरा करावा, अशा शुभेच्छा देखील आमदार कीर्तीकुमार (बंटी) भांगडिया यांनी दिल्या.

याप्रसंगी प्रामुख्याने नेवजाबाई भैया हितकारीणी सार्वजनिक गणेश मंडळाचे अध्यक्ष अशोकजी भैय्या, प्रसिद्ध उद्योजक तथा माजी नगरसेवक गौरव भैय्या, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष कृष्णाजी सहारे, उपविभागीय पोलीस अधिकारी जाधव, न.प.चे माजी बांधकाम सभापती विलास विखार, राजू पाटील देवतळे, आवेश पठाण, मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टीचे नेते, तालुका पदाधिकारी व शहर पदाधिकारी, कार्यकर्ते तथा प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

✻✻✻✻✻✻

**नियमित वाचा... अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार**

# - ब्रम्हपुरी शहरातील गणेश मुर्ती दर्शन -



नेवजाबाई भैया हितकारिणी सार्व. गणेश मंडळ, ब्रम्हपुरी



ब्रम्हपुरीचा महाराजा गणेशोत्सव मंडळ, ब्रम्हपुरी

बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404